www.rajdand.com
सातारा सोमवार
४. ३. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

शरद पवारांची निर्णायक खेळी

महादेव जानकरांना माढा अन् वंचितला 'इतक्या' जागांची ऑफर?

मुंबई : शिवसेना आणि राष्ट्रवादीतील फुटीनंतर दोन्ही पक्षांतीलएक मोठागट सत्तेत सामील झाल्यामुळे विरोधकांचीमहाविकास आघाडीकमकुवत झाल्याचं बोललं जात आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांच्या महायुतीला टक्कर देण्यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुखशरद पवारयांच्याकडूनमहाविकास आघाडीतआणखी मित्रपक्ष जोडण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचं दिसत आहे. याचाच एक भाग म्हणूनशरद पवारहे मागील काही दिवसांपासून वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर आणि रासपचे अध्यक्ष आणि माजी मंत्रीमहादेव जानकरयांच्या संपर्कात आहेत. महाविकास आघाडीच्या जागावाटपाची बोलणी अंतिम टप्प्यात असताना आता शरद पवार यांच्याकडून या दोन्ही नेत्यांना थेट ऑफर देण्यात आल्याचे समजते.-ऊतएठढखडएचएछढ-वी लूमहाविकास आघाडीच्या कोट्यातून वंचित आघाडीला ४ ते ५ जागा आणिमहादेव जानकरयांच्या रासपला शरद पवार हे आपल्या पक्षाच्या कोट्यातून माढ्याची जागा सोडण्यास तयार असल्याची माहिती आहे.

हे दोन्ही पक्ष सोबत आल्यास लोकसभा निवडणुकीत सोशल इंजिनिअरिंग साधणं महाविकास आघाडीला शक्य होणार आहे. यादृष्टीनेच शरद पवार यांचा प्रयत्न सुरू असून पुढील काही दिवसांत प्रकाश आंबेडकर आणि महादेव जानकर या दोन्ही नेत्यांसोबत शरद पवार हे याबाबत प्रत्यक्ष भेटीत अंतिम चर्चा करतील, अशी शक्यता आहे. जानकरांनी काय प्रतिक्रिया दिली?माढा लोकसभेची जागा सोडण्याची तयारी शरद पवारांकडून दाखवण्यात आल्यानंतर महादेव जानकर यांनी पवार यांच्या या निर्णयाचं स्वागत केलं आहे. माढ्याची जागा सोडण्याची तयारी दाखवल्याबद्दल आम्ही शरद पवार यांचा सन्मान करतो, मात्र आता उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि काँग्रेस पक्ष आम्हाला कोणती जागा देणार, हे स्पष्ट करावं, अशी मागणी महादेव जानकर यांनी केली आहे.दरम्यान, महादेव जानकर हे मागील काही काळापासून भाजपसह महायुतीवर नाराज असल्याचं दिसत आहे. जानकर यांनी अनेकदा भाजपविरोधात वक्तव्य करत आपली नाराजी जाहीरपणे व्यक्तही केली आहे. त्यामुळे जानकर यांना महाविकास आघाडीकडे खेचण्यासाठी शरद पवारांनी पुढाकार घेतला असल्याचे समजते.

अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांकडून तुफान प्रचार

मुंबई : यंदा पहिल्यांदाच बारामतीतील लोकसभा निवडणुकीच्या इतिहासात पवार विरूद्ध पवार असा सामना रंगताना दिसणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. एकीकडे राष्ट्रवादीत फूट पडलेली असताना पक्षाचा बालेकिल्ला असलेल्या बारामतीमध्येच पवार कुटुंबात थेट सामना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अजित पवार यांच्या गटाकडून सुनेत्रा पवार निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचेही म्हटले जात आहे. अशातच आता बारामतीमध्ये राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून सुनेत्रा पवार यांचे स्टेटस ठेवण्यात आले आहे. तर यंदा भाकरी फिरणार, यंदा विकासाच्या जोरावर सुनेत्रा पवार खासदार होणारबारामतीच्या अजित पवार गटातील कार्यकर्त्यांकडून सोशल मीडियावर स्टेटस टाकून सुनेत्रा पवार यंदा खासदार होणार असल्याची घोषणाबाजी करण्यात येत असल्याचे पाहायला मिळत आहे. दरम्यान, गेल्या काही तासांपूर्वी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी तुतारीचं स्टेटस ठेवत प्रचार सुरू केला होता. त्यानंतर अजित पवार गटाकडून असा प्रचार करण्यात येत आहे.

४०० जागा कसे जिंकतात तेच पाहतो

उद्धव ठाकरे भाजपाविरोधात आक्रमक; म्हणाले

भाजपाचं आणि आमचं हिंदुत्त्व खूप वेगळं

आम्हाला भाजपाचं हिंदुत्त्व मान्य नाही. आमचं हिंदुत्त्व वेगळं आहे, असंही उद्धव ठाकरेंनी स्पष्टपणे सांगितलं. आम्ही हिंदुत्त्वाच्या मुद्द्यावर भाजपासोबत होतो. मात्र भाजपाचं आणि आमचं हिंदुत्त्व खूप वेगळं आहे. मला भाजपाचं हिंदुत्त्व मान्य नाही. आज समाजवादी विचारांचे सगळे लोक माझ्यासोबत आले आहेत. मुस्लीम लोकही आज माझ्यासोबत आहेत. कारण आमचं हिंदुत्त्व हे घरातली चूल पेटवणारं आहे. भाजपाचं हिंदुत्त्व हे घर पटेवणारं आहे. आमचं हिंदुत्त्व हे संत गाडगेबाबा यांचं हिंदुत्त्व आहे. जो तहाणलेला असेल त्याला पाणी देणं, जो भुकेला असेल त्याला अन्न देणं, ज्याला घर नाही त्याला घर देणं हे आमचं हिंदुत्त्व आहे, असं ठाकरेंनी स्पष्टपणे सांगितलं.

मुंबई : आगामी लोकसभा निवडणुकीची कोणत्याही क्षणी घोषणा होऊ शकते. ही निवडणूक लक्षात घेता महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींना वेग आलाय. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करतायत. उद्धव ठाकरे यांनीदेखील एका जाहीर सभेला संबोधित करताना भाजपावर सडकून टीका केली. भाजपा आणि आमचं हिंदुत्त्व वेगळं आहे. भाजपा ४०० जागा कशी जिंकते तेच मी पाहतो, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

अबकी बार भाजपा तडीपार करुया

याआधीच्या लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि शिवसेनेच्या युतीने ४२ खासदार निवडून दिले नसते, तर भाजपाला दिल्लीचं तख्त राखता आलं नसतं. आता दिल्लीचं तख्त पहिल्यांदा फोडावं लागेल आणि तिथे आपलं तख्त बसवावं लागेल. अबकी बार ते ४०० पार असं सांगतायत. मी तर म्हणतो की अबकी बार भाजपा तडीपार करुया. तुम्ही ४०० पेक्षा अधिक जागा कसे जिंकतात तेच मी पाहतो, असं आव्हान उद्धव ठाकरेंनी भाजपाला दिलं.

भाजपाने आमचा विश्वासघात केला, असा आरोपही उद्धव ठाकरेंनी भाजपावर केला. अरे गेल्या वेळेला महाराष्ट्राने ४० ते ४२ खासदार निवडून दिले नसते तर भाजपाला २५० पेक्षा अधिक जागा जिंकता आल्या नसत्या. भाजपाने दोन वेळा आमचा विश्वासघात केला, असं ठाकरे म्हणाले.

योग्य वेळी योग्य निर्णय घेतो

भाजपा प्रवेशाच्या चर्चांवर खासदार नवनीत राणांचे सूचक विधान

मुंबई : : आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध पक्षांनी उमेदवारी यादी जाहीर करण्यास सुरुवात केली आहे. भाजपानेही १९५ उमेदवारांची पहिली यादी घोषित केली आहे. मात्र, महाराष्ट्रातील एकाही उमेदवाराचा यामध्ये समावेश नाही. यावरून आता भाजपावर टीका केली जात आहे. यातच अपक्ष खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत, यावर नवनीत राणा यांनी सूचक शब्दांत प्रतिक्रिया दिली.

प्रसारमाध्यमांशी बोलताना नवनीत राणा यांना भाजपा प्रवेशाच्या चर्चांवर प्रतिक्रिया विचारण्यात आली. यावर बोलताना, मी आणि रवी राणा भाजपात जाणार ही चर्चा नेहमी सुरू असते. आम्ही बोललो तरी चर्चा होते, तसेच यासंदर्भात काही बोललो नाही, तरी चर्चा असते. त्यामुळे नेहमीच आम्ही चर्चेत असतो. आम्ही योग्य वेळी योग्यच निर्णय घेत असतो, असे नवनीत राणा यांनी भाजपा प्रवेशाच्या चर्चे वर बोलताना सांगितले.

कोण राजकारणात येणार? कोण राजकारण सोडणार? हा विषय माझा नाही

आम्ही एनडीएबरोबर आहोतच, त्यामध्ये काही नवल वाटण्यासारखे नाही. नमो युवा संमेलन आहे. एनडीएचे घटक म्हणून त्या कार्यक्रमाला उपस्थित असणार आहे. इतर लोक माझ्याविषयी काय चर्चा करत आहेत? काय बोलत आहेत? यामध्ये पडणार नाही. कोण राजकारणात येणार? कोण राजकारण सोडणार? हा विषय माझा नाही. आम्ही गरिबांसाठी काम करतो आणि तेच करत राहणार, असे नवनीत राणा यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांना वाट्टेल ते बोलण्याची सवय आहे. जे होणार आहे, तेच आम्ही बोलतो. अमरावती लोकसभा मतदार संघातून कुठल्याही परिस्थितीत आपण निवडणूक लढणार असून एकवेळ राजकारण सोडू, पण नवनीत राणांचा प्रचार करणार नाही, असे शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि माजी खासदार आनंदराव अडसूळ म्हटले होते. यावर नवनीत राणा यांनी सदर भाष्य केले.

भाजपला दुसरा झटका; गुजरातच्या दिग्गज नेत्याचा लोकसभा निवडणूक लढवण्यास नकार

मुंबई : लोकसभानिवडणुकीसाठी भाजपने शनिवारी(दि.२) १६ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांतील १९५ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. पण, यादी आल्यानंतर चोवीस तासांच्या आत पक्षाला दोन झटके बसले आहेत. आधी भोजपुरी स्टार पवन सिंह यांनी पश्चिम बंगालच्या आसनसोल मतदारसंघातूननिवडणूकलढवण्यास नकार दिला, त्यानंतर आतागुजरातमधीलदिग्गज नेत्यानेहीनिवडणूकलढवण्यास नकार दिला आहे.

भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत भाजपच्या १९५ उमेदवारांची घोषणा केली. यातगुजरातचेमाजी उपमुख्यमंत्री नितीन पटेल यांना मेहसाणा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली होती. पण, आता त्यांनी आपली उमेदवारी मागे घेण्याची घोषणा केली आहे. नितीन पटेल यांनी फेसबुक पोस्टद्वारे याबाबत माहिती दिली. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये उमेदवारी मागे घेण्याचे कारण दिले नाही, पण नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान व्हावेत, अशी देवाला प्रार्थना केली. तसेच, सर्व कार्यकर्ते आणि हितचिंतकांचे आभारही मानले.कोण आहेत नितीन पटेल?

नितीन पटेल भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांपैकी एक आहेत. पटेल यांनी २०२१ मध्ये मुख्यमंत्री विजय रुपानी यांच्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री म्हणून काम केले. याशिवाय त्यांनी गुजरातच्या अनेक मुख्यमंत्र्यांसोबत काम केले आहे

दरम्यान, भोजपुरी सुपरस्टार पवन सिंहला भाजपने पश्चिम बंगालच्या आसनसोलमधून उमेदवारी जाहीर केली होती. याबाबत त्याने पक्षाचे आभारही मानले. पण, आज अचानक पवन सिंहने निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला. याबाबत पवन सिंहकडून अधिकृत कारण देण्यात आले नाही. आता नितीन पटेल यांनीही निवडणूक न लडवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे भाजपला या दोन्ही ठिकाणांसाठी नवीन उमेदवार शोधावे लागणार आहेत.

कोण कशाला जरांगेंचा घात करेल?

त्याचं नाटक मराठा समाजाच्या लक्षात आलंय, छगन भुजबळांचे टीका

नाशिक : देवेंद्र फडणवीस यांनी आपला घात केल्याचा आरोपमराठा आरक्षणआंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकर्त्यांकडून माझ्यावर हल्ला करण्याचा डाव आहे, हा प्रयोग संभाजीनगरवरून होणार होता. महिला कार्यकर्त्यांच्या आडून, एवढ्या खालच्या दर्जाला जाणे गृहमंत्र्याचे काम नाही, तुम्हाला हे शोभत नाही, असे म्हणत मनोज जरांगे यांनी देवेंद्र फडणवीसांवर निशाणा साधला. यावरून राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्रीछगन भुजबळयांनी मनोज जरांगे यांच्यावर टीकास्त्र सोडले आहे. कोण कशाला जरांगेंचा घात करेल? त्याचं नाटक सगळ्या महाराष्ट्राला आणि संपूर्ण मराठा समाजाला लक्षात आलं आहे, असेछगन भुजबळम्हणाले.-ऊतएठढखडएचएछढ-वी लूछगन भुजबळ म्हणाले की, काय त्या मनोज जरांगेंचं घेऊन बसलात? कोण कशाला जरांगेंचा घात करतील. एका क्षणी हॉस्पिटलमध्ये असतो मग तो तिकडे आंतरवली सराटीला जातो. नंतर परत म्हणतो की माझ्या छातीत दुखू लागलं. परत चालला हॉस्पिटलला. त्याचं नाटक सगळ्या महाराष्ट्राला आणि संपूर्ण मराठा समाजाला लक्षात आलं आहे. आपण सगळं केलं मराठा समाजाला आरक्षण दिलं. नवी नोकरभरती आहे, त्यातमराठा आरक्षणाच्यामाध्यमातून नोकऱ्या देण्याचे जीआर निघाले आहेत. सगळं करुनही मनोज जरांगे ऐकत नसतील तर काय बोलणार? हे मारुतीचं शेपूट आहे, ते वाढणार आहे. प्रसिद्धीची नशा चढते आणि ती कधीच प्रसिद्धी न पाहिलेल्या लोकांना ती अधिक चढते, असे म्हणत छगन भुजबळ यांनी मनोज जरांगेंवर टीका केली आहे.याचबरोबर, शनिवारी भाजपाकडून लोकसभेचा उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. यावरही छगन भुजबळ यांनी भाष्य केले. छगन भुजबळ म्हणाले की, महाराष्ट्राची यादी तयार नसेल. परंतु, महाराष्ट्रात काम करणारा उमेदवार कृपाशंकर सिंह यांना उत्तर प्रदेशमधून उमेदवारी जाहीर झाली आहे. महाराष्ट्रात ४८ खासदार आहेत. त्यांची चाचपणी करून उमेदवार ठरतील. अजित पवार गटाने १० जागा मगितल्याचा पुनरुच्चार यावेळी छगन भुजबळ यांनी केला आहे. काय म्हणाले मनोज जरांगे पाटील?

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या संवाद दौऱ्यास आजपासून सुरुवात झाली आहे. अंतरवाली सराटी येथून निघाल्यानंतर जरांगे पाटील बीड जिल्ह्यातील वानगाव या ठिकाणी दाखल झाले. यावेळी मराठा समाज बांधवांना जरांगे यांनी मार्गदर्शन केले. दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाटील यांनी पुन्हा एकदा इशारा दिला आहे. फडणवीस यांच्या कार्यकर्त्यांकडून माझ्यावर हल्ला करण्याचा डाव आहे, हा प्रयोग संभाजीनगरवरून होणार होता. महिला कार्यकर्त्यांच्या आडून, एवढ्या खालच्या दर्जाला जाणे गृहमंत्र्याचं काम नाही, तुम्हाला हे शोभत नाही. फडणवीस यांनी पोरांवरती खोटे गुन्हे दाखल केले आहेत. त्यांच्यात मराठा द्वेष ठासून भरलेला आहे. त्यांच्या सांगण्याबरून बॅनर बोर्ड काढले जात आहेत. पोलीस बोर्ड काढत आहेत, बोर्ड का काढलेत, त्यात गोळ्या घाला लिहिले आहे का, असा सवाल मनोज जरांगे पाटलांनी विचारला आहे.

यंदा देशात गव्हाचे उत्पादन उच्चांकी?

पुणे: यंदाच्या रब्बी हंगामात गव्हाचे उत्पादन ११४० लाख टनांवर जाण्याचा अंदाज केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री अर्जुन मुंडा यांनी व्यक्त केला आहे.

देशातील प्रमुख गहू उत्पादक राज्यांत फेब्रुवारी अखेरपर्यंत थंडी कायम राहिली. गहू उत्पादक राज्यांत अवकाळीसारख्या नैसर्गिक आपत्तींचा फारसा फटका बसला नाही. त्यामुळे यंदाच्या रब्बी हंगामात उच्चांकी ११४० लाख टन गहू उत्पादनाचा अंदाज केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय आणि भारतीय अन्न महामंडळाकडून व्यक्त केला जात आहे. गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यापासूनच उत्तर भारताला उष्णतेच्या झळांचा सामना करावा लागला होता. अवकाळी आणि गारपिटीसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे पिकाचे नुकसान होण्याचे प्रमाणही कमी राहिले आहे. त्यामुळे यंदाच्या रब्बी हंगामात गव्हाचे उत्पादन ११४० लाख टनांवर जाण्याचा अंदाज केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री अर्जुन मुंडा यांनी व्यक्त केला आहे.

१० मार्च रोजी पुण्यात गांधी दर्शन शिबीर

पुणे : महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्या वतीने रविवार, दि. १० मार्च २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत 'गांधी दर्शन' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कोथरूड येथील गांधी भवनच्या दुस-या मजल्यावरील सभागृहात हे शिबीर होणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या हिंदी विभागप्रमुख डॉ. शशिकला राय (गांधीजीं सोबत मैत्री),डॉ. कुमार सप्तर्षी (सत्याग्रहशास्त्र), मुंबईचे पत्रकार सोहित मिश्रा (महात्मा गांधी आणि आजचे वर्तमान) हे मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.' 'गांधी दर्शन' विषयावरचे हे अकरावे शिबीर आहे.

अधिक माहितीसाठी सुदर्शन चखाले (प्रकल्प प्रभारी) - ७८८७६३०६१५,संदीप बर्वे (विश्वस्त सचिव, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी) - ९८६०३८७८२७,सचिन पांडुळे (अध्यक्ष, युवक क्रांती दल पुणे शहर) - ९०९६३१३०२२ यांच्याशी संपर्क साधता येईल. शिबिरासाठी शंभर रुपये नोंदणी शुल्क आहे. त्यात शिबिरस्थळी नाश्ता,चहा आणि भोजनाचा समावेश आहे

ट्रकची दुचाकीला धडक दुचाकीस्वाराचा मृत्यू

पिंपरी : ट्रकने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. या अपघातात दुचाकी स्वाराचा मृत्यू झाला आहे. हा अपघात बुधवारी (दि.२८) मेदनकरवाडी, आळंदी फाटा येथे घडला आहे. यावरून ओमकार बाजीराव कुलाळ (वय १९ रा.चाकण) यांनी चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरून आयशर कंपनीचा लाल रंगाचा ट्रक वरील अज्ञात चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पवारसाहेबांची लाचारी आणि अगतिकता पाहवत नाही

सातारा : 'काय होतास तू काय झालास तू, अरे वेड्या राजकारणापायी इतका लाचार आणि अगतिक होऊन कसा घायाळ झालास तू ' ! अस एकेकाळच्या महाराष्ट्रातील राजकीय पोशिंद्याच शब्दात वर्णन करताना माझ्या भावनिक बंधनाचा कोंडमारा होतो आहे आहे कारण साहेबांना इतक्या लाचारीत बघण्याची मला त्यांचा कट्टर राजकीय विरोधक विश्लेषक म्हणून सवय नाही, अर्थात साहेबांचा राजकीय सातबाराचे इतिवृत्त करत असताना सुद्धा मलाच माझी शाब्दिक वस्त्रे बाजूला सारून त्यांच्यावर आता साहेब थांबा आता ते कायमचे ! असे सांगण्यावाचून दुसरा तिसरा कोणताच पर्याय दिसत नाही , याचा अर्थ सध्याचे उपमुख्यमंत्री व साहेबांचे पुतणे व राजकीय वारसदार अजितदादा पवार यांनी मध्यंतरीच्या काळात हा माणूस इतकं वय झालं तरी थांबायला तयार नाही असे सांगून पवारसाहेबांविषयी संताप व्यक्त केला होता त्यावर साहेबांनी माझ वय झालं म्हणण्याऱ्यांनी माझं काय बघितलंय असं काहीस धारबंद नसलेलं हाताने इशारा दिलेलं उत्तर तर एखाद्या तमासगीराला लाजवेल इतकं पराकोटीची सिमा गाठणार होत .

आजच बारामतीच्या कार्यक्रमात पुतण्या अजितने अपमानास्पद वागणूक देऊन सुध्दा पवारसाहेबांनी आपलं नाव रोजगार मेळाव्यात कार्यक्रम पत्रिकेत नोंदवायला सरकारला भाग पाडले हा बालहट्ट कमी की काय म्हणून त्यांनी त्या कार्यक्रमात भाषण ठोकत विद्या प्रतिष्ठान या संस्थेची मुहूर्तमेढ पन्नास वर्षांपूर्वी म्हणजे सन -१९७१ मध्ये मीच रोवली होती आणि त्यावेळी माझा पुतण्या राजकारण व समाजकारणात वुणे वीस वर्षांचा होता हे जवळपास अंगूली निर्देश करत सांगून टाकावं याचा अर्थ असा की यापुढे मी माझ्या कन्येच्या लोकसभा निवडणुकीतील विजयासाठी चांगलीच कंबर कसली असल्याचे अधोरेखित केले आहे , यावर कढी करत अजितदादा यांनी बारामती तालुका हा देशातील पहिला विकासाभिमुख तालुका असेल की जो तालुका सर्वांगीण विकासासाठीचे मोजमाप ओलांडून पुढे गेलेला असेल असा शब्दच त्यांनी देत आपण किती विकासाभिमुख राजकारण करत आहोत हेच स्पष्ट केले , त्यामुळे या काका - पुतण्याची राजकीय जुगलबंदी ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर रंगली अर्थात या रंगाचा बेरंग यावेळी झाला नाही याचा अर्थ यापुढे होणारच नाही असा होत नाही कारण ' अरे म्हटलं की कारे होणार ' यात काही शंका नाही .

शरदचंद्र पवारसाहेब यांचा रायगडावर डोलीत बसून 'चढाई 'करतानाचा फोटो पाहिला आणि मला बालगंधर्वांच्या वृद्धापकाळातील झालेल्या ससेहोलपटीची पुस्तकरुपी आठवण झाली, वसंत शांताराम देसाई यांनी त्यांच्या बालगंधर्वांच्या चरित्रात बालगंधर्वांच्या म्हातारपणी झालेल्या हालअपेष्टांचे जे हृदयद्रावक वर्णन केले आहे. त्यामध्ये शेवटच्या दिवसात बालगंधर्व विकलांग झाले होते आणि त्यांना धड उभेही राहता येत नव्हते पण पैशाची गरज असल्याने त्यांच्या दुसऱ्या पत्नी गोहरबाई या बालगंधर्वांच्या त्याही परिस्थितीत मैफिली घडवून आणत होत्या , परिणामी त्यांना रेल्वेने प्रवास करताना हमाल एखादे बाजक उचलून डब्यात टाकावे त्याप्रमाणे बालगंधर्वांचे मुटकुळे रेल्वेच्या डब्यात ढकलून देत होते. अशा परिस्थितीत बालगंधर्व गायचे तेव्हा रसिकांच्या डोळ्यात अश्रुधारा वाहात व ऐन उमेदीतल्या बालगंधर्वांच्या आठवणींनी ते व्याकूळ होत कारण ज्या बालगंधर्वांनी रसिक मायबापावर अनंत माया केली व रसिकांच्या प्रसन्नतेसाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला त्यांच्यावर ही वेळ यावी या वास्तवाने रसिकांच्या हृदयाची लाही लाही होई , आज अगदी काहीशी तशीच अवस्था शरदचंद्र पवारसाहेबांची झाली आहे , एकीकडे दुर्धर रोगाचा हिमतीने सामना करतानाच अनेक शस्त्रक्रिया झेलून म्हातारपणी सुद्धा तरुणांना लाजवेल अशा तडफेने दौरे व सभा घेण्याची त्यांची जिद्द म्हणण्यापेक्षा हौस वाखाणण्यासारखी आहे पण काही वेळेस वाटते की हे उसनं अवसान तर नाही ना? आणि हे कशासाठी व कोणासाठी तर ते आहे लाडक्या लेकीला लोकसभेत पुन्हा बारामती लोकसभा मतदारसंघातून निवडून आणून पुन्हा तिचा राजकीय जिर्णोद्धार करण्यासाठीच नाही का

दोन टर्म खासदार राहिलेल्या आपल्या लाडक्या लेकीला अर्थात सुप्रियाताई सुळे यांना एक तप उलटून गेले तरी राजकारणात स्वतः चा ठसा निर्माण करण्यात आलेले पुरते अपयश आणि अजितदादांनी त्यांच्या चुलत बहिणीच्या राजकारणातील महत्त्वकांक्षेला मारलेली ग्यानबाची मेख म्हणा किंवा पाचर यामुळे अगतिक होऊन पवारसाहेब आता इरेला पेटले आहेत का ? किंवा आपल्या वडिलांचा वापर करून आपली राजकीय पोळी भाजून घेण्याची ही लेकीची , गोहरबाई प्रमाणे चाल आहे हे काही केल्या कळायला मार्ग नाही, अर्थात याच उत्तर जर द्यायचे असेल तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शब्दांत केवळ 'कालचक्र, कालचक्र आणि कालचक्र इतक्या वारंवार येणाऱ्या सलग तीन शब्दांत आहे.

मराठी चित्रपटांच्या रांगेतील सामना चित्रपट बघितला की मला ऐन उमेदीच्या काळात शरदचंद्र पवारसाहेबांनी दिवसाढवळ्या अनेकांना कसे राजकीय अस्मान दाखवण्याच्या ज्या करामती केल्या त्याबद्दल 'लोक माझे सांगाती'मध्ये साहेबांनी स्वतःच स्वतःची पाठ थोपटून घेण्यात कुठलीही कसर सोडलेली नाही त्यावेळी त्यांनी अजितदादांचे मोठे चुलते वसंतराव पवार (शरदचंद्र पवारसाहेब यांचे सर्वात थोरले बंधू) यांच्याविरुद्ध एका निवडणुकीत काँग्रेसचा प्रचार करून त्यांचा पराभव कसा घडवून आणला याचे रसभरीत वर्णन या आत्मचरित्रात आहे ही कृती म्हणजे पवार घराण्यात असलेले विचारस्वातंत्र्य आणि स्वतःची वैचारिक बांधिलकी याचे उत्तम उदाहरण असल्याची मल्लिनाथी शरदचंद्र पवारसाहेबांनी केली आहे , पण तेच पवारसाहेब हे अजितदादांचे विचारस्वातंत्र्य मानण्यास मात्र आज तयार नाहीत याचा अर्थ'हम करे सो कायदा' याची काळजी साहेबांनी घेतली आहे .स्वतःच्या मोठ्या भावाच्या विरुद्ध हे प्रचार करणार पण सुनेत्राताई पवार या सुप्रियाताईं विरुद्ध उभ्या ठाकणार त्यावेळी तो प्रसंग यांच्या जिव्हारी लागणार याला म्हणतात साहेबांनी लोकांसाठी राबवलेली लोकशाही आहे का नाही सारी मज्जाच मज्जा याचा अर्थ ' गिरे तो भी टांग उपर'

नांदवळ धरणात लवकरच पाणी सोडणार : संजीवराजे नाईक निंबाळकर

जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर यांचा सत्कार करताना नागेश जाधव, समवेत आमदार मकरंद पाटील, दीपक चव्हाण, डॉ. सुयोग लेंभे, सुहास जाधव, संजय साळुंखे. (छाया: शुभम गुरव)

आसनगाव : पावसाअभावी राज्यात दुष्काळाची छाया आहे. धरणात पुरेसे पाणी नाही. लोकांना पाणीपुरवठ्यासाठी सरकार प्रयत्नशील असून नांदवळ धरणात लवकरच पाणी सोडले जाईल, असे आश्वासन जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर यांनी दिले. माजी खासदार (स्व.) लक्ष्मणराव पाटील यांच्या ८६ व्या जयंतीनिमित्त आयोजित सर्वरोग निदान शिबिराचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. अजिंक्यतारा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल (सातारा) आणि आशीर्वाद हॉस्पिटल व समर्थ मेडिकलच्या वतीने वाठार स्टेशन येथे हे शिबिर आयोजिले होते. यावेळी संजीवराजे बोलत होते. आमदार मकरंद पाटील यांच्या अध्यक्ष तर आमदार दीपक चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तात्या परखड व शिस्तप्रिय होते. त्यांनी प्रत्येक कार्यकर्त्याला बळ दिले, असे स्पष्ट करून संजीवराजे म्हणाले, तात्या म्हणजे कार्यकर्ते घडवण्याची शाळा होती. अडीअडचणीत ते सर्वांच्या पाठीशी उभे राहत. चुकीला चूक म्हणण्याचा करारीपणा त्यांच्याकडे होता. अशावेळी ते पुढील व्यक्तीचा मुलाहिजा ठेवत नव्हते. उन्हाळ्यात पाणीटंचाई गंभीर होणार असून धरणातील पाणी मर्यादित आहे. उत्तर भागाचा पाणीप्रश्न सोडवण्याचा आमचा प्रयत्न असून नांदवळ धरणात लवकरच पाणी सोडले जाईल.आमदार मकरंद पाटील म्हणाले, आरोग्य शिबिराच्या माध्यमातून रामभाऊ लेंभे व डॉ. सुयोग लेंभे व सुहास जाधव यांनी तात्यांच्या स्मृती चिरंतन ठेवल्या आहेत. शिबिराचा गोरगरिबांना लाभ होणार आहे. किसन वीर आबांमुळे तात्यांच्या राजकारणाला ऊर्जितावस्था आली. त्यांनी जवळपास सर्व प्रमुख पदे मिळवली. आबांनी उभ्या केलेल्या साखर कारखान्यावर तात्यांचे विशेष प्रेम होते. आज त्यावर ९९५ कोटींचे कर्ज आहे. तरीही सभासदांबाबत आम्हाला तळमळ असल्यामुळे कारखाना सुरू आहे. सर्वत्र पाण्याची बिकट अवस्था आहे. ज्येष्ठ नेते रामराजेंच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामार्फत निधी मिळवून या भागाचा पाणीप्रश्न सुटावा म्हणून पाठपुरावा करणार आहे. यावेळी आमदार दीपक चव्हाण, बाळासाहेब सोळसकर , डॉ. प्रसन्न बाबर यांची भाषणे झाली. विठ्ठल माने व रणजीत लेंभे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुयोग लेंभे यांनी प्रास्ताविक केले. ऋषी जाधव यांनी आभार मानले. यावेळी जिल्हा बँकेचे संचालक रामभाऊ लेंभे, सुरेशराव साळुंखे, मंगेश धुमाळ, अशोकराव लेंभे, नागेश जाधव, अंकुशराव जाधव, विकास साळुंखे, ललित मुळीक, अजय कदम, शशिकांत भोईटे, जितेंद्र जगताप, संजय साळुंखे, राहुल भोईटे, बळीराम काळोखे, रावसाहेब लेंभे, भरत साळुंखे, संदीप धुमाळ, सुर्यकांत निकम, दीपक पिसाळ, अशोक लेंभे, डॉ.

खासदार करुन तुम्ही मला दूर लोटलंत

सुजय विखे पाटील यांचं मोठं वक्तव्य

शिर्डी : भाजपाचे खासदार सुजय विखे पाटील यांनी शिर्डी या ठिकाणी भाषण करताना एक मोठं वक्तव्य केलं. तुमच्या सगळ्यांच्या आशीर्वादाने मी नगरचा खासदार झालो. खासदर करुन तुम्हीच दूर लोटलं असं सुजय विखे पाटील यांनी म्हटलं आहे. सुजय विखे पाटील यांना आगामी लोकसभा निवडणुकीचं तिकिट मिळणार नाही अशा चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. अशात आता त्यांनी शिर्डीतल्या सभेत हे वक्तव्य केलं आहे ज्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

काय म्हणाले सुजय विखे पाटील?

अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार

सुजय विखे पाटील यांच्या उपस्थितीत शिर्डी जवळ असलेल्या राहाता शहरात महिला बचत गटाला साहित्य आणि निधी वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी बोलताना त्यांनी सूचक विधान केलं आहे. आमच्यावर झालेल्या प्रत्येक आरोपांना मी दोन महिन्यांनी उत्तरं देईन. सध्या लोकसभेची व्यस्तता आहे. शिर्डी मतदारसंघातील जनतेच्या आशीर्वादाने मी खासदार झालो आहे. मात्र खासदार करून तुम्हीच मला लांब लोटलं. माझे दोन महिने होऊ द्या. नंतर मी कायमचा इकडे (शिर्डी) येईन. काळजी करू नका, असं वक्तव्य केल्याने सुजय विखेंना नेमकं म्हणायचं काय? असा प्रश्न उपस्थित होतो आहे.

कार्यकर्त्यांना सुनावले खडे बोल

सुजय विखे यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना कार्यकर्त्यांना खडेबोल सुनावलं. जनतेची कामं जे करतील अशा कार्यकर्त्यांच्या हस्तेच मी सत्कार स्वीकारेन. मला हार तुरे आणणारे नको. तर जनतेची कामे करणारे कार्यकर्ते हवेत. आपल्यावर होणाऱ्या प्रत्येक आरोपांचे उत्तर जनतेची कामे करून द्या. आपल्यावर नेहमीच आरोप होतात. आपल्या विरोधात कुणी कितीही मोर्चे काढू द्या. विखे पाटलांना शिव्या देणाऱ्यांचा निषेध करत विरोधकांचा अपमान करणारा आमचा सच्चा कार्यकर्ता नाही. तुम्ही आमच्या विरोधाकांना अपमानीत करून आमच्या मनामध्ये स्थान निर्माण कराल असे वाटत असेल तर तो तुमचा गैरसमज. कैलासवासी बाळासाहेब विखे पाटलांची ही शिकवण नाही, अशा शब्दांत सुजय विखेंनी कार्यकर्त्यांना सुनावलं आहे.

वारसा संस्कृती'ला रसिकांची उत्स्फूर्त दाद

पुणे: रामाच्या पारी घरी येणारा ग्रामीण संस्कृतीतील वासुदेव, भलगरी दादा भलगरी म्हणत बैलजोडीसह पेरणीला- लावणीला निघालेला शेतकरी दादा, पश्चिम महाराष्ट्रातील डोक्यावर समई ठेवून नृत्याची 'दिवली' कला, विठुरायाच्या भक्तीरसात न्हाऊन निघालेले अभंग आणि वारी आदी वैविध्यपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत वारसा संस्कृतीचा कार्यक्रमाने महासंस्कृती महोत्सवात बहार आणली.

निमित्त होते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षाचे औचित्य साधून जिल्ह्यात सांस्कृतिक कार्य विभाग आणि पुणे जिल्हा प्रशासनाच्यावतीने आयोजित कार्यक्रमाचे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सांस्कृतिक कला रंगमंदिर येरवडा येथे या महासंस्कृती महोत्सवाचे अपर जिल्हाधिकारी अजय मोरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, उपविभागीय अधिकारी स्नेहा किसवे - देवकाते, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर उपस्थित होते.

महायुतीत मावळचा तिढा कायम

भाजपच्या दाव्याने शिंदे गटात चलबिचल

पिंपरी : राज्यातील सत्तेत एकत्र असलेल्या महायुतीमधील भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत मावळ लोकसभा मतदारसंघावरून ताणाताणी सुरू असल्याचे दिसते. १५ वर्षांपासून मावळ मतदारसंघ शिवसेनेकडे आहे. यावेळी मावळमध्ये कमळावर निवडणूक लढविण्याची आग्रही मागणी भाजप कार्यकर्त्यांनी केली आहे. तर, शिंदे यांच्या शिवसेनेचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे हे आपली उमेदवारी निश्चित असल्याचे सांगतानाच चिन्ह सांगणे खुबीने टाळतात. त्यामुळे बारणे हे कमळावर निवडणूक लढविण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मावळ मतदारसंघातील सलग तीन निवडणुका शिवसेनेने जिंकल्या आहेत. परंतु, आता शिवसेनेचे दोन गट झाल्याने भाजपने आक्रमकपणे मावळवर दावा केला आहे. मावळमध्ये भाजपची सर्वाधिक ताकद असल्याचे सांगत हा दावा जोरकसपणे केला जात आहे. राज्यातील सर्वाधिक मतदारसंख्या असलेले पनवेल आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघ मावळमध्ये येतात. चिंचवडच्या अश्विनी जगताप, पनवेलचे प्रशांत ठाकूर हे भाजपचे तर उरणचे अपक्ष आमदार महेश बालदी भाजपशी संलग्न आहेत. पिंपरी-चिंचवड, पनवेल या दोन महापालिकांमध्ये भाजपची सत्ता होती. तळेगाव दाभाडे, लोणावळा यांसह चार नगरपरिषदाही भाजपकडे होत्या. शेकडो ग्रामपंचायती भाजपच्या ताब्यात आहेत. त्यामुळे मावळमध्ये एकदा कमळावर निवडणूक लढविली पाहिजे.

कमळाच्या चिन्हावर मतदान करण्याची संधी आम्हाला मिळाली पाहिजे. १५ वर्षे हा मतदारसंघ शिवसेनेकडे आहे. आता भाजपला मिळावा अशी मागणी वरिष्ठांकडे केली असल्याचे पिंपरी-चिंचवड शहरातील भाजप पदाधिकाऱ्यांनी सांगितले. खासदार श्रीरंग बारणे यांचा नामोल्लेख टाळत आमचा कोणालाही विरोध नाही. पण, कमळ चिन्ह असावे. पक्षश्रेष्ठी ज्याला उमेदवारी देतील, त्याला दोन लाख मतांच्या फरकाने निवडून आणले जाईल, असाही विश्वास व्यक्त केला. याशिवाय गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनीही मावळमध्ये कमळ फुलले पाहिजे असा आग्रह असल्याचे कर्जत येथील आढावा बैठकीत सांगितले.

भाजपचे पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर तीन वेळा निवडून आले आहेत. एकवेळा काँग्रेस आणि सलग दोनवेळा भाजपकडून आमदार आहेत. पुढील वेळी विधानसभेला निवडून आल्यास आणि महायुतीची सत्ता कायम राहिल्यास मंत्रिपदासाठी प्रबळ दावेदारी राहील, यामुळे ते लोकसभा लढविण्यास इच्छुक नसल्याचे सांगितले जाते.

दुरंगी की तिरंगी लढतीवर ठरणार सांगलीचा भावी खासदार

सांगली : गत पंचवार्षिक सांगली लोकसभा निवडणूक तिरंगी झाली होती. त्यामुळे काँग्रेसच्या मतांमध्ये विभाजन होऊन भाजपचे संजय पाटील यांचा विजय सोपा झाला. हीच खेळी भाजपकडून पुन्हा खेळली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे संजय पाटील विरुद्ध विशाल पाटील यांच्यात दुरंगी लढत होणार की अपक्ष उमेदवार चंद्रहार पाटील रिंगणात उतरल्यास तिरंगी होणार आहे. यावर सांगलीचा भावी खासदार ठरण्याची शक्यता आहे.-ऊतएठढखडएचएछढ-वी लूसांगलीलोकसभाहा १९६२ ते २०१४ पर्यंत काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला होता. मात्र, २०१४ च्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लाटेत काँग्रेसचे विद्यमान केंद्रीय राज्यमंत्री प्रतीक पाटील यांचा पराभव झाला. पूर्वी काँग्रेसमध्ये असलेले संजय पाटील हे ऐनवेळी भाजपमध्ये प्रवेश करून खासदार झाले. त्यानंतर २०१९ च्या निवडणुकीत तिरंगी लढत झाली. पूर्वाश्रमीचे भाजपचे असलेले गोपीचंद पडळकर यांनी ऐनवेळी वंचित बहुजन विकास आघाडीची उमेदवारी घेतली. काँग्रेसच्या मतात फूट पडल्याने त्यांना तीन लाखांहून अधिक मते मिळाली. त्यामुळे काँग्रेस आघाडीच्या पाठिंब्यावरील स्वाभिमानी पक्षाचे उमेदवार विशाल पाटील यांचा पराभव होऊन संजय पाटील हे दुस-यांदा भाजपचे खासदार झाले.आगामी लोकसभा निवडणुकीत हॅट्रीक करण्याचे मनसुबे आखलेल्या खासदार पाटील यांनी मतदारसंघातील गावागावात आपला गट तयार केला आहे. परंतु, पक्षांतर्गत रोष रोखण्यात त्यांना अद्याप यश आलेले नाही. त्यामुळे पक्षाचे विद्यमान आमदार व पदाधिकारी उघडपणे नाराजी व्यक्त करीत आहेत. तसेच, पक्षश्रेष्ठींकडे उमेदवार बदलाची मागणी होत असलतरी खासदार पाटील यांना पर्याय देणारा तगडा उमेदवार भाजपकडे सध्यातरी नाही. माजी जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज देशमुख व दीपक शिंदे यांच्याकडून जिल्ह्यात दौरे सुरू आहेत. त्यामुळे ऐनवेळी उमेदवार बदलायची की पुन्हा संजय पाटील यांनाच संधी द्यायची, या द्वीधामनस्थितीत पक्षाश्रेष्ठी आहेत. त्यामुळे भाजपच्या लोकसभेच्या पहिल्या यादीत पाटील यांचे नाव नाही.

विशाल पाटील यांना काँग्रेस की शिवसेनेची उमेदवारी ?

गतपंचवार्षिक निवडणुकीतील विशाल पाटील यांच्या कॉग्रेसच्या उमेदवारीवरून शेवटपर्यंत गोंधळ सुरू होता. ऐनवेळी विशाल यांनी स्वाभिमानीची उमेदवारी घेतली. काँग्रेसऐवजी स्वाभिमानीकडून लढल्याने काँग्रेसच्या हक्काच्या मतांपासून ते वंचित राहिले. काँग्रेसची काही मते वंचितचे उमेदवार पडळकर यांच्याकडे झुकल्याने भाजपची खेळी यशस्वी ठरली. आता कोल्हापूरची शिवसेनेची जागा शाहू छत्रपती यांना सोडून सांगलीची जागा शिवसेनेला देण्याची महाविकास आघाडीत चर्चा आहे. त्यामुळे पुन्हा एकदा काँग्रेसच्या हक्काची सांगलीची जागा शिवसेनेला सोडावी लागली. तर विशाल हे काँग्रेसचे उमेदवार राहणार की शिवसेनेची उमेदवारी स्वीकारणार याविषयी उत्सुकता आहे.

वंचित, स्वाभिमानीचा दावा...

गतपंचवार्षिक निवडणुकीत काँग्रेसऐवजी स्वाभिमानीची उमेदवारी विशाल पाटील यांनी घेतली. त्यामुळे या मतदारसंघावर स्वाभिमानीचे अध्यक्ष राजू शट्टी यांचा दावा आहे. तर दुहेरी महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांनी वंचित बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष डॉ. प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली. त्यामुळे वंचितनेही महाविकास आघाडीच्या पाठिंब्यावर सांगली मतदारसंघावर दावा केला आहे. चंद्रहार यांची अपक्ष उमेदवारी कायम ठेवण्यात भाजप यशस्वी झाला. तर गतवर्षांप्रमाणे पुन्हा एकदा तिरंगी लढत होऊ शकते. तिरंगी ऐवजी दुरंगी लढत होण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांचा कस लागणार आहे.

२०१९ च्या सांगली लोकसभेतील मतदान

उमेदवार	पक्ष	मतदान
१) संजय पाटील	भाजप	५, ०८,९९५
२) विशाल पाटील	स्वाभिमानी	३,४४,६४३
३) गोपीचंद पडळकर	वंचित	३,००,२३४

सांगली लोकसभेतील विधानसभानिहाय मतदार

मिरज : ३,१९,९९९
सांगली : ३,३१, ६५२
जत : २,७९, ५२७
खानापूर -आटपाडी : ३,३२,०५३
पलूस-कडेगाव : २,८३,००५
तासगाव-कवठेमहांकाळ : २,९८,२२०
एकूण मतदार : १८,४४, ४५६

सांगली लोकसभेतील आमदार भाजप : २

काँग्रेस : २
राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) : १
शिवसेना (शिंदे गट) : १

मुख्य संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

संख मध्यम प्रकल्पात पाणी देण्याच्या हालचाली

प्रकाश जमदाडे ; पाटबंधारे अधिकाऱ्यांच्या समवेत बैठक

जत : तालुक्यातील माडग्याळसह दहा गावांना म्हैसाळ योजनेतून पाणी देण्यात यश आल्यानंतर आता गुड्डापूर तलावातून पुढे संख मध्यम प्रकल्पात पाणी देण्याच्या हालचाली गतीमान झाल्या आहेत. येत्या आठ दिवसात हा देखील प्रश्न सुटून लवकरच संख मध्यम प्रकल्पात पाणी सोडण्यात यशस्वी होऊ, असा विश्वास जिल्हा बँकेचे संचालक प्रकाश जमदाडे यांनी व्यक्त केला.

यासंदर्भात नुकतेच वारणाली येथे खासदार संजय पाटील व माजी आमदार विलासराव जगताप यांच्या उपस्थितीत पाटबंधारे अधिकाऱ्यांच्या समवेत बैठक झाली. यात निश्चित मार्ग काढण्याचे धोरण ठरले आहे. पूर्व भागातील आणखी पंचवीस गावांना याचा लाभ होणार आहे. यावेळी अधीक्षक अभियंता चंद्रशेखर पाटोळे, कार्यकारी अभियंता, उपअभियंता खरमाटे, कार्यकारी अभियंता कोरे, विठ्ठल निकम, सोम्माणा हाक्के, सुभाष बसवराज पाटील, साहेबराव टोणे, राजू निळे, माणिक पाटील उपस्थित होते.

जमदाडे म्हणाले, १९९५ साली जत तालुक्याचा म्हैसाळ योजनेत समावेश केला. त्यावेळी २२५०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊन १६ पाटबंधारे तलाव, संख आणि दोड्डनाला माध्यम प्रकल्प भरून देण्यात येणार होते. परंतु अनुशेष आणि राजकीय अनास्थेमुळे आजही योजना पूर्ण होऊ शकली नाह, हे दुर्दैव म्हणावं लागेल.

दरम्यान, पूर्व भागातील माडग्याळसह दोडडनाला पर्यंत पाणी नेण्यासाठी आपण सतत पाठपुरावा केला. शेतकऱ्यांसह जनतेचाही मोठा रेटा लागला होता. त्यामुळे खासदार संजय पाटील व माजी आमदार विलासराव जगताप यांच्या माध्यमातून प्रयत्न करून अनेक अडथळे पार करून १७ डिसेंबरला माडग्याळ ओढ्यात पाणी सोडण्यात आले.

पाणी सोडण्यासंदर्भात ठोस कृती आराखडा

जमदाडे म्हणाले, आज मितीस दोन पाझर तलाव व १४ सिमेंट बंधारे भरून दोड्डनाला भरू लागला आहे. त्यामुळे शेतकरी जनावरे यांचा पिण्याचा व शेतीचा प्रश्न काही अंशी मिटला आहे. आता इथूनच पुढे व्हसपेठ तलाव भरून गुड्डापुर तलावात पाणी सोडले, तर संख माध्यम प्रकल्प भरला जाणार आहे. त्यासाठी पाठपुरावा केला आहे. या संदर्भात वारणाली येथे खासदार संजय पाटील व माजी आमदार विलासराव जगताप यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यात संख तलावात पाणी सोडण्यासंदर्भात ठोस कृती आराखडा आखला आहे.

शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार

जत तालुक्यात दुष्काळाची दाहकता मोठी आहे. तालुक्यात सद्या ४९ गावांना ५० टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरवले जात आहे. यामुळे जर तातडीने चालू आर्वतनात संख, अंकलगी, गुड्डापुर, व्हसपेठ तलाव भरल्यास येथील पिण्याच्या पाण्याबरोबर शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. यसाठी खास बाब म्हणून निधी उपलब्ध करून या भागाला न्याय द्यावा, अशी मागणी आम्ही या बैठकीत करून ती मान्य करून घेतली आहे, असे जमदाडे यांनी सांगितले.

दोन वर्षांत संपूर्ण महाराष्ट्रात गटशेतीचा कार्यक्रम

आमिर खान; सत्यमेव जयते फार्मर कप २०२३' पुरस्कार वितरण

कोल्हापूर : येत्या दोन वर्षांत संपूर्ण महाराष्ट्रात गटशेतीचा कार्यक्रम राबविणार आहे. या माध्यमातून शेकडो शेतकरी-उद्योजक घडवायचे आहेत, असे प्रतिपादन पाणी फाऊंडेशनचे संस्थापक अभिनेते आमिर खान यांनी केले. फाऊंडेशनच्या वतीने आयोजित 'सत्यमेव जयते फार्मर कप २०२३' पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. सह्याद्री फार्मचे संचालक विलास शिंदे हे यावेळी प्रमुख पाहुणे होते. पानी फाउंडेशनच्या संस्थापिका किरण राव, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ, सीईओ रीना दत्ता, मार्गदर्शक डॉ. अविनाश पोळ, प्रसिद्ध अभिनेते जॅकी श्रॉफ, बॉलिवूड अभिनेता प्रकाश राज, अतुल कुलकर्णी, पुष्कर श्रोत्री, आदिनाथ कोठारे, दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, मंजिरी फडणीस इत्यादी मान्यवरांनी कार्यक्रमाला हजेरी लावली.

राज्यातील १८ जिल्ह्यांतील ३९ तालुक्यांमधील ३००० गटांनी या स्पर्धेत भाग घेतला. यातील २१ गटांची अंतिम फेरीची निवड करण्यात आले. त्यातून कुंभारगाव ता. करमाळा जि. सोलापूर येथील कुंभारगाव ऍग्रो प्रोड्यूसर कंपनी यांना १५ लाख रुपयांचा प्रथम पुरस्कर देण्यात आला. घोडेगाव ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर येथील आई जिजाई महिला शेतकरी गट आणि वारंगा तर्फ नांदापुर ता. कळमनुरी जि. हिंगोली येथील उन्नती शेतकरी गट यांना दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार विभागून आला. सन्मानचिन्ह आणि रोख ५ लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. शेरेवाडी ता. आटपाडी जिल्हा सांगली येथील प्रगती महिला शेतकरी गट आणि सौंदे ता. करमाळा जि. सोलापूर येथील रॉयल फार्मर शेती गट यांना तिसरा पुरस्कार विभागून देण्यात आला. २ लाख ५० हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

अभिनेते जितेंद्र जोशी आणि अभिनेत्री स्पृहा जोशी यांनी सूत्र संचालन केले. यावेळी शेतकऱ्यांची महती गाणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.

सहभागी मान्यवरांचा सत्कार

फार्मर कपमधील सहभागी शेतकरी गटांना मार्गदर्शन करणारे शास्त्रज्ञ, अहमदनगर येथील स्नेहालय आणि अंमळनेर येथील दीपस्तंभ संस्था तसेच सह्याद्री फार्म, से ट्रीज संस्था, उमेद संस्था, पोकरा संस्था, बजाज ऑटो लिमिटेड, पत्रकार राजीव खांडेकर, राज्यातील विविध कृषी विद्यापीठांतील शास्त्रज्ञ यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारे तज्ज्ञ डी. एल. मोहिते यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

पिराची कुरोलीत नवीन आरोग्य उपकेंद्रास मंजूरी

राज्य शासनाची मान्यता ; राहुल कौलगे पाटील यांच्या पाठपुराव्यास यश

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील पिराची कुरोली येथे जगत्गुरू संत तुकाराम महाराज पालखी मुक्कामाचे गाव असून गावात लाखो वारकरी येत असतात. त्यामुळे गावातील नागरिकांसह भाविकांच्या हिताच्या दृष्टीने महत्वाचे असणारे आरोग्य उपकेंद्र व्हावे, यासाठी सतत पाठपुरावा केला होता. त्यास आता यश मिळाले असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडून नवीन आरोग्य उपकेंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती सोलापूर जिल्हा किसान काँग्रेसचे अध्यक्ष राहुल कौलगे पाटील यांनी दिली.

राज्यात महायुतीचे सरकार असताना शिवसेनेचे तत्कालीन आरोग्यमंत्री डॉ. दिपक सावंत यांच्याकडे प्रथम या आरोग्य उपकेंद्राबाबत मागणी करण्यात आली होती. त्यावेळी खासदार राहुल शेवाळे, विधानपरिषद उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांच्या सहकार्याने पाठपुरावा चालू होता. त्यावेळी परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यासाठी जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आला. त्यानंतर राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर फेर प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या राजीनाम्यानंतर फाईल माघारी आली, मात्र पाठपुरावा सुरूच ठेवला, असे असे कौलगे पाटील यांनी सांगितले.

खास बाब सरकारकडे शिफारस

राज्याचे आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्याकडे याबाबत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आ. नाना पटोले, विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेसचे सोलापूर जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांनी खास बाब म्हणून शिफारस केली. त्यास अखेर मान्यता मिळाली असून आता नवीन आरोग्य उपकेंद्रास स्थापन होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असे कौलगे पाटील यांनी सांगितले.

पिराची कुरोली येथे आरोग्य उपकेंद्र स्थापन व्हावे, यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा सुरू होता. यास राज्य सरकारची मान्यता मिळाल्याने परिसरातील नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहे.

-राहुल कौलगे पाटील, अध्यक्ष, सोलापूर जिल्हा किसान काँग्रेस

खा. श्रीनिवास पाटील यांनी अधिकाऱ्यांची घेतली झाडाझडती

दिशा कमिटीच्या आढावा बैठकीत कौशल्य विकास योजनेच्या कामावर नापसंती

कराड : भारत सरकारने कौशल्य विकास योजना सुरू केली. या योजनेमध्ये गवंडी, सुतार, लोहार, मेकॅनिक इत्यादी कामे करणाऱ्या नागरिकांना प्रशिक्षित केले जाते. त्यांना रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी प्रयत्न केले जातात. या योजनेचा आढावा घेताना दिशा समितीच्या बैठकीमध्ये खासदार श्रीनिवास पाटील यांनी संबंधिता अधिकाऱ्यांना या योजनेमधून सातारा जिल्ह्यात आतापर्यंत किती लोकांना प्रशिक्षण देण्यात आले आणि किती लोकांना रोजगार मिळाला, याची माहिती देता येईल का? असा प्रश्न विचारताच अधिकारी निरूत्तर झाले.

बैठकीस जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नांगराने, दिशा कमिटीचे अशासकीय सदस्य राजाभाऊ काळे, संगीता साळुंखे, सतीश कांबळे, बाळकृष्ण नलावडे, अजित माने, मारुती मुळावडे, समिंद्रा जाधव, विजय जगदाळे, किरण साबळे पाटील, ॲड. विनीत पाटील, शुभांगी ढेरे जगदाळे उपस्थित होते.

यंदा जिल्ह्यामध्ये पाऊस कमी झाल्यामुळे पिण्याचे पाण्याची समस्या निर्माण होणार आहे. यासाठी प्रशासनाने योग्य काळजी घ्यावी, जलजीवन योजनेच्या कामाला गती द्यावी, सूचनाही खासदार पाटील यांनी जलजीवन मिशनच्या अधिकाऱ्यांना केली. राष्ट्रीय महामार्गाचे आढावा घेताना कराड, उंब्रज, नागठाणे, वेळे उड्डाणपूल आणि सेवा रस्त्याला सेवा रस्त्याच्या उंचीमुळे नागरिकांची शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याने त्याचा विचार करुन योग्य मार्ग काढण्याचीही सूचना खासदार पाटील यांनी केली

जिल्हाधिकारी दुडी यांनी आदर्श शाळा योजना जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्यासाठी संबंधित तालुक्याच्या बीडीओंना जबाबदार धरले, तर ग्रामपंचायतीने शाळेच्या स्वच्छतेसाठी कर्मचारी उपस्थित करून देण्याच्या सक्त सूचना केल्या आहेत.

घरकुल आवास योजनेत सातारा जिल्हा पुणे विभागात प्रथम आल्याबद्दल तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी व व संबंधित तालुक्यातील गटविकास अधिकाऱ्यांने अभिनंदन करण्यात आ**ले.**

हॉस्पिटलवर फौजदारी करा

आरोग्य विभागाचा आढावा घेताना कोरोना काळामध्ये सीएसआर फंडातून कोरोना सेंटरसाठी देण्यात येणाऱ्या मशिनरी संबंधित सेंटर चालकांनी सरकारला जमा केल्या नाहीत. आरोग्य विभागाने संबंधित मशनरी एका आठवड्याच्या आत संबंधित सेंटरकडून घ्यावी, कोणी परत करणार नाहीत, अशा सेंटर व हॉस्पिटलवर फौजदारी गुन्हा दाखल करावा, असे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आरोग्य विभागाला दिले.

ठेकादारांना दंड आकारा

जलजीवन मिशनमधून जिल्ह्यात १५५६ योजना मंजूर झाल्या आहेत. यातील ४०३ कामे पूर्ण झाली असल्याचे अधिकारी सांगतात. अधिकाऱ्यांनी पूर्ण झालेल्या योजनांची पाहणी करावी आणि ज्या योजनांची कामे पूर्ण झाली आहेत, अशा गावात काम करणाऱ्या ठेकेदाराचा सत्कार करावा, तर योजना कागदोपत्री पूर्ण दाखविण्यात आली असेल तर संबंधित ठेकादारांना दंड आकारण्यात यावा, अशी सूचना खासदार पाटील यांनी केली.

जगात विविध वैज्ञानिक शोधात भारत अग्रस्थानी

डॉ. व्यंकटेश गंभीर; राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त व्याख्यान

सोलापूर : भारतात आपल्याला इस्रो आणि भाभा अनुसंधान संस्था या दोनच वैज्ञानिक शोध घेणाऱ्या आपल्याला माहीत आहेत. परंतु या दोन संस्थाखेरीज असंख्य संस्था भारतात वेगवेगळ्या क्षेत्रात नवनवीन शोध लावून संपूर्ण जगाला मार्गदर्शन करीत आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. व्यंकटेश गंभीर यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी, मुंबई यांच्या सहाय्याने दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ ते ४ मार्च २०२४ या कालावधीत राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा-डॉ. लक्ष्मीकांत दामाहोते. यावेळी कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. विकास पाटील, डॉ. अंजना लावंड, डॉ. अभिजित जगताप, डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. अशोक शिंदे, डॉ. विपुल प्रक्षाळे आदी उपस्थित होते.

डॉ. गंभीर म्हणाले, भारतीयांनी आपल्या मानसिकतेत बदल करणे गरजेचे आहे. शिकलेले ज्ञान व्यवहारात कसे आणता येईल, याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. आज अनेक क्षेत्रात भारत जगामध्ये एकमेव असा देश आहे, ज्याने जगात अनेक शोध पहिल्यांदा लावले आहेत. अनेक देश आपल्या देशाकडून मार्गदर्शन व सल्ला घेत आहेत.

प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. अंजना लावंड यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी केले, तर आभार डॉ. शिवाजी शिंदे यांनी मानले.

भारताचं महत्व अधोरेखित

अमेरिकेतील न्यायालयात चाललेल्या एका खटल्याचा निकाल भारतातील हैद्राबाद येथील सीसीएमबी लॅबमधील अहवालावरून लावला जातो. यावरून भारताचं वैज्ञानिक क्षेत्रातील महत्व अधोरेखित होतं. विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच विज्ञान व तंत्रज्ञानाची आवड लावावी. या क्षेत्रामध्ये करिअर करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन डॉ. वगंभीर यांनी केले.

वडोली निळेश्वरमधील अंतर्गत रस्त्याची समस्या निकाली

मसूर : वडोली निळेश्वर (ता. कराड) येथील अंतर्गत रस्त्यासाठी निधीची आवश्यकता होती. निधी अभावी अनेक वर्ष रस्ता झालेला नव्हता. या रस्त्यासाठी भाजपा सातारा लोकसभा समन्वयक रामकृष्ण वेताळ यांच्या विशेष प्रयत्नाने ७ लाख रुपये निधी मंजूर झाला आहे. या रस्त्याची भूमिपूजन वेताळ यांच्या हस्ते झाले.यामुळे वडोली निळेश्वरच्या अंतर्गत रस्त्याची समस्या कायमची निकाली निघणार आहे.

वडोली निळेश्वर मधील प्रताप पवार यांच्या दुकानापासून बाळासो पवार यांच्या घरापर्यंतचा रस्ता अतिशय खराब झाला होता. या रस्ता दुरुस्तीची मागणी मागील अनेक वर्षांपासून होती. या रस्त्यासाठी ग्रामविकास मंत्री ना. गिरीश महाजन यांनी २५ १५ योजनेअंतर्गत ७ लाख रुपये निधी मंजूर केला आहे. या निधी मंजुरीसाठी भाजप किसान मोर्चाचे सरचिटणीस रामकृष्ण वेताळ यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या पाठपुरावाला यश आल्याने हा अंतर्गत रस्ता लवकरच तयार होणार आहे.

यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद गायकवाड, कराड उत्तर अध्यक्ष शंकर शेजवळ, उपाध्यक्ष शरद चव्हाण, सरचिटणीस तुकाराम नलावडे, जिल्हा सचिव दिपाली खोत, शंकर पाटील, अक्षय चव्हाण, अनिल खरात, बाळासाहेब पवार, बाळासाहेब डुबल उपसरपंच जालिंदर पवार, चेअरमन सुरेश पाटील, शशिकांत डुबल, बजरंग पवार, प्रकाश डुबल, संचालक जयराम डुबल, ग्रामपंचायत सदस्य दीपक पवार, रघुनाथ भोसले, हणमत पवार, बडा जगदाळे, बबन पवार, यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. युवा नेते रोहित डुबल यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध.

कराड उत्तर मधील गावांमध्ये रस्ते, पाणी, वीज या समस्या आजही शिल्लक आहेत. या समस्या सोडवण्यासाठी ना. गिरीश महाजन यांच्याकडे पाठपुरावा करून निधी मिळवण्यासाठी व विकासासाठी कटिबद्ध राहणार आहे.

- रामकृष्ण वेताळ, सरचिटणीस, भाजपा किसान मोर्चा महाराष्ट्र

पालिकेच्या वादग्रस्त लेखापालांची बदली

प्रभारी कार्यभार महेश सावंत यांच्याकडे

सातारा : अवघ्या पाचच महिन्यात आपल्या कार्यशैलीमुळे वादग्रस्त बनलेल्या सातारा पालिकेच्या लेखापाल शबनम शेख यांची सहसंचालक वित्त व कोषागार विभाग कार्यालय पुणे येथे बदली करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश वित्त व कोषागार संचालनालयाच्या सहाय्यक संचालक दीपा पाटील यांनी काढले आहेत.

सातारा पालिकेच्या लेखापाल शबनम सलीम शेख या पाच महिन्यापूर्वी लेखापाल पदावर साताऱ्यात बदलून आल्या होत्या. मात्र फायलींवर अनावश्यक शेरे मारणे, देयके थांबवून ठेवणे, फाईल अनाधिकाराने ताब्यात ठेवणे, ठेकेदाराला चिरीमिरीची मागणी करणे असे अनेक आरोप त्यांच्यावर करण्यात आले होते. त्यामुळे पालिकेच्या दैनंदिन कामकाजामध्ये अडचणी निर्माण होत असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या. त्यानुसार मुख्याधिकारी प्रशासक अभिजीत बापट यांनी शेख यांची सुनावणी घेऊन त्या संदर्भातील सविस्तर अहवाल वित्त व कोषागार विभागाचे मुख्य सचिव एन. रामास्वामी यांना पाठवला होता. सध्या लेखापाल पदाचा कार्यभार सातारा पालिकेचे ऑडिटर महेश सावंत यांच्याकडे देण्यात आला आहे. बुधवारी सातारा पालिकेच्या वतीने अंदाजपत्रकाची मांडणी होणार आहे.

हे बजेट सुमारे ३०० कोटी रुपयांचे असल्याची माहिती आहे. या बजेटवर प्रभारी लेखापाल महेश सावंत यांची स्वाक्षरी असणार आहे. अनियमित लेखा पद्धतीची वित्त विभागाने गंभीर दखल घेऊन शबनम शेख यांची वित्त व कोषागारे सहसंचालक कार्यालय पुणे येथे सक्तीने बदली केली आहे. त्यामुळे सातारा पालिका मुख्याधिकारी व लेखाधिकारी यांच्यातील शीतयुद्ध संपुष्टात आले आहे.

प्रवासात महिलेचे दागिने व रोख रक्कम चोरीला

पिंपरी : प्रवासा दरम्यान महिलेची दागिन्याची व पैशांची पिशवी चोरीला गेली आहे. दि. १९ फेब्रुवारीला सांगली ते रुपीनगर असा बस व रिक्षाच्या प्रवासात ही घटना घडली. याप्रकरणी महिलेने चिखली पोलीस ठाण्यात गुरुवारी (दि.२९) फेब्रुवारी रोजी फिर्याद दिली आहे. यावरून अज्ञात इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी व त्यांच्या मुलांसह भावाला भेटण्यासाठी सांगली ला गेल्या होत्या. यावेळी त्या बसने पुण्याला व तेथून पुढे रिक्षाने रुपीनगरला आल्या. राहत्या घरी आल्यानंतर फिर्यादीने बॅग उघडली असता बॅगेमधून दागिन्यांची पिशवी दिसली नाही.

त्या बॅगेत ४५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने, ३ हजार चांदीचे दागिने,१० हजार ५०० रुपयांची रोख रक्कम असा एकूण ५८ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. यावरून चिखली पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

उत्तूरला दहावीची कॉपी विरहीत परीक्षा

साखर देऊन मुलांचे केल स्वागत : देशभक्तीपर गाण्यांची धून

उत्तूर : येथील दहावींच्या केंद्रावर परीक्षेस सुरुवात झाली आहे. उत्तूरच्या उत्तूर विद्यालय, उत्तूर व पार्वती शंकर विद्यालय या दोन केंद्रावर परीक्षा सुरू आहेत. गेली कित्येक वर्षाची कॉपी विरोधी परंपरा विद्यालयाने जपली असून परीक्षा शांततेत व सुरळीत सुरू आहे.

कॉपी विरहीत परीक्षेची परंपरा कायम असल्याने विद्यार्थी कॉपी करीत नाहीत, तर पालक ही दोन्ही केंद्राकडे फिरकत सुद्धा नाहीत. त्यामुळे परीक्षा शांतेतच्या वातावरणात होत आहे.

उत्तूर विद्यालयात देशभक्तीपर गीते व समूह गीते म्हणून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले, तर केंद्राध्यक्ष शैलेंद्र आमणगी यांनी वर्गात मुलांना परीक्षा सुरू होण्यापूर्वी साखर देऊन परीक्षार्थींचे तोंड गोड केले. तर पार्वती शंकर विद्यालयात केंद्राध्यक्ष एम. यु. शिकलगार यांनी स्वागत केले.

४१९ विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था

दोन्ही केंद्रातर्गत उत्तूर येथील तीन माध्यमिक शाळा, बहिरेवाडी, आरदाळ, महागोंड, अरळगुंडी, बारवे, पिंपळगाव, चिमणे आदी गावातील शाळांचे विद्यार्थी परीक्षेला येतात. उत्तूर विद्यालयात २७३ तर पार्वती शंकर विद्यालयात १६३ विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे.

कृषि सहायक सचिन जाधव यांचा गौरव

फलटण : महाराष्ट्र शासनाच्या पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल सासकल (ता फलटण) येथील कृषि सहायक सचिन जाधव यांचा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. फलटण, महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विभाग, मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या वतीने कृषि, कृषि संलग्न क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येथते. पीएम किसान योजना व नमो महासन्मान निधी योजना निधी वितरण कार्यक्रमाचे औचित्य कृषि सहाय्यक साधून सचिन जाधव यांचा जितेंद्र डुडी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाग्यश्री पवार, प्रगतशील दत्तात्रय धुमाळ, शेतकरी उपस्थित होते.

सातारा जिल्ह्यातून दोघांवर तडीपारीची कारवाई

सातारा : सातारा शहर हद्दीतील मोटार सायकल चोरीसह विविध गुन्हे करणाऱ्या दोघांना सातारा जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी काढले आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, सातारा शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सातत्याने मालमत्तेविरुध्दचे गुन्हे करणारे टोळी प्रमुख ऋतिक ऊर्फ बाबा अजय जाधव (वय २२), सुश्रीत तानाजी सावंत (वय २१, दोन्ही रा. लक्ष्मीटेकडी सदरबझार, सातारा) यांच्यावर दरोडा टाकणे, दुखापत पोचवून शिवीगाळ दमदाटी करणे, मोटरसायकल चोरी करणे, हद्दपार आदेशाचे उल्लंघन करण्याबाबतचे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

सातारा शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एम. जे. जगताप यांनी जाधव, सावंत या टोळीविरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे पूर्ण सातारा जिल्ह्यातून दोन वर्षे तडीपार करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्याकडे सादर केला होता. त्याचीचौकशी पोलीस उपअधीक्षक किरणकुमार सूर्यवंशी यांनी केली होती. जाधव, सावंत यांच्याविरोधातसातारा जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपारीचे आदेश काढले आहेत.

अपघातप्रकरणी युवकावर गुन्हा

सातारा : तालुक्यातील निनाम ते मांडवे या रस्त्यावर वाहन चालवण्याचा परवाना नसतानाही एक युवक उसाचा ट्रकर चालवत होता. त्याच्या ट्रक्टरची धडक एसटी बसला (एमएच ११ बीएल ९४२७) बसून अपघात झाला. या प्रकरणी युवकावर गुन्हा दाखल केला आहे. दि. १० फेब्रुवारीला सायंकाळी ६ वाजता अपघात घडला. या प्रकरणी रितेश बाळू क्षीरसागर (वय २०, रा. धामणगाव, ता. जामखेड, जि. अहमदनगर) याच्याविरोधात पोलीस हवालदार जितेंद्र बबन इंगुळकर (वय ५५) यांनी बोरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस हवालदार निंबाळकर तपास करत आहेत.

देगाव येथून युवक बेपत्ता

सातारा : शुभम सुनील साळुंखे (वय २५) हा देगाव येथील राहते घरातून दि. २८ फेब्रुवारीला सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास कोणालाही काहीही न सांगता निघून गेला आहे. सुनील एकनाथ साळुंखे (वय ५६, देगाव, ता. सातारा) यांनी सातारा तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस हवादार पिसाळ तपास करत आहेत.

आंबेदरे येथे चैनस्नॅचिंग

सातारा : आंबेदरे गावच्या हद्दीत महालक्ष्मी मंदिराजवळ मॉर्निंग वॉक करत असलेल्या व्यक्तीच्या गळ्यातील ३५ हजार रुपये किंमतीची सोन्याची चैन दुचाकीवरुन आलेल्या दोघा अज्ञातांनी हिसकावून नेली. ही घटना दि. १ मार्चला सकाळी ७ च्या सुमारास घडली. बसवराज गजानन स्वामी (वय ४५, रा. पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा) यांनी सातारा तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस उपनिरीक्षक गुरव तपास करत आहेत.

दोन अल्पवयीन मुलीना फूस लावून पळवले

सातारा : दोन अल्पवयीन मुलींना फुस लावून पळवून नेल्याप्रकरणी १७ वर्षीय अल्पवयीन मुलाविरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना दि. २९ फेब्रुवारीला सायंकाळी ७ वाजता घडली. याबाबत एका मुलीच्या आईने शाहूपुरी पोलीस ठाण्यात तक्रारी दिली आहे. पोलिसांनी तपास केले असता ते तिघे गोडोली येथे आढळून आले. सहायक पोलीस निरीक्षक आंबले तपास करत आहेत.

कारंडवाडी येथे मारहाण, विनयभंग

सातारा : कारंडवाडी येथे पतीस मारहाण करत शिवीगाळ, दमदाटी केली. तसेच महिलेच्या शरिराशी अश्लिल वर्तन केले. दि. २९ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता हा प्रकार घडला. या प्रकरणी महिलेल्या तक्रारीवरुन लक्ष्मण महादेव साळुंखे, संतोष रामचंद्र साळुंखे तसेच अन्य एका महिलेविरोधात (सर्व रा. कारंडवाडी, ता. सातारा) सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस हवालदार पिसाळ तपास करत आहेत.

ट्रॅव्हल्स मधून दहा लाखांची चोरी

सातारा : ट्रॅव्हल्स मधून अज्ञात चोरट्यांनी एका प्रवाशाच्या दहा लाखांची चोरी केल्याची फिर्याद भुईंज पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक २२ फेब्रुवारी रोजी मयूर मनीलाल परमार रा. राधिका आपार्टमेंट, गोवा हे स्लीपर कोच एसी डॉल्फिन ट्रॅव्हल्स क्र. एमपी ०९ डीडी ९९५४ या ट्रॅव्हल्स मधून प्रवास करत होते. रात्री दहा ते साडेदहा वाजण्याच्या दरम्यान ही ट्रॅव्हल्स बोपेगाव, ता. वाई गावच्या हद्दीतील हॉटेल कोहिनूर येथे जेवणासाठी थांबली असता परमार हे सुद्धा जेवण करण्यासाठी ट्रॅव्हल्समधून खाली उतरले. जेवण करून पुन्हा ट्रॅव्हल्समध्ये त्यांच्या सीटवर जाऊन पाहिले असता त्यांच्या लगेज बॅगमधील त्यांच्या ताब्यातील रक्कम दहा लाख रुपये रोख अज्ञात दोन चोरट्यांनी चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबाबतची फिर्याद भुईंज पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक आर. एस. भंडारे करीत आहेत.

बाळासाहेब माळी यांचे निधन

मायणी : सेलम असोसिएशन रिफायनरी संस्थेचे संस्थापक ,तसेच गलाई बांधव संघटनेचे संघटक व मायणी ता.खटाव गावचे रहिवासी बाळासाहेब निवृत्ती माळी (बाळू शेठ) यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले .ते येतील प्रथितयश डॉक्टर उदय माळी यांचे वडील होते. त्यांच्या पक्षात विवाहित दोन मुले ,मुली .तसेच पत्नी, सुना ,नातवंडे असा परिवार आहे.

मुलीवर अत्याचार करणाऱ्यास १२ वर्षांचा कारावास

सातारा : वाठार स्टेशन पोलीस ठाण्याच्या हद्दीत २०१६ मध्ये ५ वर्षय मुलीवर जबरी संभोग करणारा आरोपी संतोष आबासो भोईटे (रा. तडवळे संमत वाघोली, ता. कोरेगाव) याला विशेष जिल्हा सत्र न्यायालयाने १२ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.

याबाबत माहिती अशी की, पाच वर्षीय मुलगी दि. २८ जुलै २०१६ रोजी राहत्या घराजवळच्या रस्त्यावर उभी होती. त्यावेळी आरोपी संतोष आबासो भोईटे याने 'तुला चॉकलेट देतो,' असे म्हणून तिच्या हातात १० रुपयांची नोट दिली. त्यानंतर तिला घराच्या पाठीमागे छप्परामध्ये नेवून जबरी संभोग केला. याबाबत पिडीतेच्या आईने वाठार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्याचा तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक एस. ए. निकम यांनी करुन न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले होते.

विशेष जिल्हा सत्र न्यायाधीश श्रीमती के. व्ही. बोरा यांनी या खटल्याचा निकाल दिला. सरकारतर्फे सहायक सरकारी वकिल सौ. मंजुषा तळवलकर यांनी खटल्याचे कामकाज पाहिले. या खटल्यात एकुण १३ साक्षीदार तपासले. पिडीत बालिका, फिर्यादी, न्यायवैद्यकीय प्रयोगशाळा तज्ज्ञ, तपासी अधिकारी यांच्याकडील पुरावा सदर प्रकरणामध्ये महत्वाचा मानला गेला.

साताऱ्याच्या अंगणवाडी सेविका होणार हायटेक

५११० मोबाईलचे होणार वाटप

सातारा : सातारा जिल्हा परिषदेच्या वतीने स्मार्ट अंगणवाडी करण्याच्या दृष्टीने अंगणवाडी सेविकांना ५११० मोबाईल वितरीत करण्यात येणार असून दरवर्षी १०० अंगणवाड्यांचा विकास करणार असून टप्प्याटप्प्याने हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे मत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी व्यक्त केले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की अंतर्गत ग्रामीण भागामध्ये एकूण ४५६० अंगणवाडी कार्यरत असून अंगणवाडीमध्ये पूर्व प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या तीन ते सहा वयोगटातील बालकांची संख्या ७३ हजार २२९ आहे या बालकांसाठी जिल्हा परिषद सदस्य निधी मधून अंकुर बाल शिक्षण उपक्रम राबवण्यात येणार आहे.

सद्यस्थितीत राज्य शासनामार्फत अंगणवाडीतील बालकांसाठी 'आकार' अभ्यासक्रमानुसार पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी वेगवेगळे उपक्रम घेण्यात येणार आहे. यामध्ये बालकांच्या वयोगटानुसार अभ्यासक्रम लेखन सामग्रीचा अभाव होता. अंकुर बालशिक्षण अंतर्गत तीन गट पडले असून यामध्ये तीन ते चार वयोगटासाठी पुस्तक व नोंदवही आणि चार ते पाच वयोगटासाठी तीन पुस्तके नोंदवही, पाच ते सहा वयोगटासाठी तीन पुस्तके, नोंदवही देण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमांमध्ये मराठी व इंग्रजी भाषेत आहे. पर्यवेक्षिकांचे व प्रत्येक बीट मधील दोन सेविकांचे प्रशिक्षण टप्प्याटप्प्याने मे महिन्यापर्यंत आयोजित केले जाणार आहे.

या उपक्रमांमुळे पालकांची शाळा पूर्व शैक्षणिक तयारी होणार असून ही मुले भविष्यात प्राथमिक शाळेत मिळणार आहेत त्यामुळे शाळा भरतीचे प्रमाण कमी होऊन विद्यार्थ्यांची संख्या वाढण्यास निश्चितच मदत होणार असल्याचे महत्व नागराजन यांनी व्यक्त केले.

जिल्ह्यातील १९ प्रकल्पांतील १७ आदर्श पर्यवेक्षिका, १८ आदर्श अंगणवाडी सेविका व १८ आदर्श अंगणवाडी मदतनीस यांना पालकमंत्री शंभूराजे देसाई तसेच जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी यांच्या शुभहस्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सेविकांना ५११० मोबाईल राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागातर्फे प्राप्त झाले आहेत. अंगणवाडी खोली करणे, मुलांची उपस्थिती, गृहभेटी, पोषण आहाराच्या नोंदी, गरोदर महिलांच्या आहाराची नोंद, पूर्व प्राथमिक शिक्षणाची नोंद यासह अनेक कामे पोषक ट्रॅक्टरवर अंगणवाडी सेविकांना दररोज भरावी लागणार आहे. नवीन मोबाईल सॅमसंग कंपनीचे असून उत्तम दर्जाचे असल्याची माहिती त्यांनी दिली आहे नवीन मोबाईलच्या मुळे ऑनलाईन माहिती भरण्याच्या कामात गती येणार असून केंद्र शासनालाही अंगणवाडी सेवकांनी भरलेली माहिती दाखवा पूर्ण होणार आहे.

सातारा शहरातील ९ कामांसाठी ३ कोटी ३० लाख मंजूर

आ. शिवेंद्रसिंहराजे; नगरविकास विभागाकडून मिळवला निधी

सातारा : सातारा शहरात विकासकामांचा झंजावात सुरु ठेवणाऱ्या आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या माध्यमातून शहरातील आणखीन ९ विकासकामे मार्गी लावण्यासाठी ३ कोटी ३० लाख रुपये निधी उपलब्ध झाला आहे. आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या पाठपुराव्यातून राज्याच्या नगरविकास विभागाने वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून हा निधी मंजूर केला आहे. निधी मंजूर केल्याबद्दल आ. शिवेंद्रसिंहराजेंनी मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, ना. अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

शहरातील पेढ्याचा भैरोबा येथील उद्यान विकसित करणेसाठी १ कोटी, विलासपूर, गोळीबार मैदान येथे रस्ते खडीकरण, डांबरीकरण आणि गटर करणेसाठी ९० लाख,

मोरे कॉलनी महादरे रॉड येथे रस्ते खडीकरण, डांबरीकरण व गटर बांधणेसाठी ५० लाख, चैतन्य कॉलनी, गणेश कॉलनी, तामजाई नगर येथे बंदिस्त गटर करणेसाठी १५ लाख, भैरवनाथ कॉलनी, पिलेश्वरी नगर येथील ओपन स्पेसमध्ये वॉल कम्पाऊंड व बगीचा करणेसाठी २० लाख, प्रायमरी सैनिकी स्कुल ते शशी धुमाळ घर अखेर रस्ता डांबरीकरण करणे १५ लाख, प्रभाग ३ मध्ये किशोर लोखंडे घर ते कल्पशिल्प अपार्टमेंट अखेर रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे १० लाख, जयमल्हार हौ. सोसायटी येथे चतुर घर ते जरंडेश्वर मंदिर अखेर रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे २० लाख आणि जयमल्हार हौ. सोसायटी अंतर्गत रस्ता काँक्रीट करणेसाठी १० लाख रुपये निधी मंजूर झाला आहे.

दोनच दिवसांपूर्वी आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या माध्यमातून शहरातील ४४ विकासकामे मार्गी लावण्यासाठी १३ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यांनतर आता आणखी ९ कामे मार्गी लावण्यासाठी ३ कोटी ३० लाख रुपये मंजूर करण्यात आले असून आ. शिवेंद्रसिंहराजेंनी सातारा शहरात विकासकामे मार्गी लावण्याचा धडाका सुरु ठेवला आहे. यामुळे सातारकरांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. दरम्यान, मंजूर कामांची निविदा प्रक्रिया व इतर शासकीय सोपस्कार तातडीने पूर्ण करा. कामे दर्जेदार करून वेळेत पूर्ण करा अशा सूचना आ. शिवेंद्रसिंहराजेंनी पालिकेच्या

बैंड बँजो संघटनेचे जिल्हा प्रशासनाला निवेदन

सातारा : महाराष्ट्रातील बैंड-बँजो कलाकारांच्यासाठी प्रशासनाच्या वतीने विविध योजना राबविणार असल्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिले. अखिल महाराष्ट्र बैंड-बँजो संघटनेच्यावतीने विविध प्रश्नावर निवेदन देण्यासाठी अशोकराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली शिष्टमंडळ मंत्रालयात गेले होते.

बँड कलेला लोककलेचा दर्जा द्यावा, ग्रामीण भागातून सदर कलाकारांना प्रवास करत असताना पोलिसांच्याकडून होणारा त्रास बंद व्हावा, किमान ५ ते ५० जणांचा वाद्य समूह असणाऱ्या वादकांना तसेच वृद्ध कलाकारांना मानधनाचा लाभ मिळावा व सदर कला समाजामध्ये रुजवण्यासाठी शालेय पातळीवर तिला न्याय द्यावा इत्यादी मांगण्यांचे निवेदन उपमुख्यमंत्री पवार यांना दिले. याप्रसंगी आ. मकरंद जाधव पाटील यांनी कलाकारांच्या समस्या विस्तृतपणे उपमुख्यमंत्र्यांना सांगितल्या. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष सचिन वायदंडे, सरचिटणीस सुभाष अडागळे, प्रदेश सदस्य तसेच माजी उपसभापती आनंदराव भोंडवे व बाळासाहेब जाधव इत्यादी उपस्थित होते.

नवमाध्यमांचा वापर करताना आपण एकमेकांमधील संवाद विसरत चाललो असल्याचं म्हटलं. आपल्यामधील संवाद तुटणार नाही याची काळजी घेऊन प्रत्यक्ष लोकांशी संवाद साधण्याची गरज असल्याचं त्यांनी म्हटलं.

विद्रोही अभ्यास शिबिराला चळवळीचे कार्याध्यक्ष कॉ. धनाजी गुरव, कवी वाहरुभाऊ सोनवणे,डॉ. भास्कर कदम, प्रा. अजित जगताप, डॉ. रवींद्र चव्हाण, प्रा. संजय भोईटे, ॲड. सरफराज बागवान, ॲड. सुभाष पाटील, डॉ. सुवर्णा कांबळे, डॉ. जालिंदर घिगे, प्रा. बापू चंदनशिवे यांच्यासह विद्रोहीचे कार्यकर्ते उपस्थित होते. विद्रोही कार्यकर्त्यांनी चळवळीची गाणी सादर केली. अभ्यास शिबिराच्या उद्घाटन सत्राचं सूत्रसंचालन प्रा. गौतम काटकर आणि आभार शिवराम ठवरे यांनी मांडले.

गिरणी कामगारांच्या पेन्शनंसाठी साताऱ्यात धरणे आंदोलनं

सातारा : गिरणी कामगारांना सरकार किती दिवसांत घर देणार ते निश्चित करावे, गिरणी कामगारांच्या वारसांना पेन्शन मिळावी या मागणीसाठी हनुमंत निकम यांनी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे.

जिल्हा प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटलें आहे की, गिरणी कामगारांनी आपल्या हक्काची लढाई स्वतः लढल्याशिवाय यश मिळणार नाही.

गिरणी कामगारांना घरे, पेन्शन यासह आरोग्य सुविधा द्यावी, पूर्ण मिलच्या जागेचा एक तृतीयांश जागेचा कायदा होता, पण कामगारांना विश्वासात न घेता मोकळ्या जागेच्या एक तृतीयांश जागेचा चुकीचा कायदा केला. हा कायदा सरकारने रद्द करावा, अशी मागणी निवेदनात केली आहे.

महायुतीच्या घटक पक्षांनी रिपाईचा सन्मान ठेवावा

लोकसभेसाठी महाराष्ट्रात दोन जागा मागणार, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे साताऱ्यात प्रतिपादन

सातारा : संपूर्ण महाराष्ट्रासह पूर्व भारत तसेच अंदमान निकोबार येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या पक्षाची ताकद आहे .त्यामुळे महाराष्ट्रात महायुतीच्या घटक पक्षांनी मोठ्या मित्रांचा विचार करताना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या घटक पक्षाचाही विचार करून त्यांना योग्य प्रतिनिधित्व द्यावे व पक्षाच्या योगदानाचा सन्मान करावा अशी अपेक्षा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केली . तसेच येत्या लोकसभा निवडणुकांमध्ये रिपाईसाठी महाराष्ट्रात दोन जागांची मागणी करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने सातारा चर्मकार समाजाच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमासाठी रामदास आठवले सातारा जिल्हा दौऱ्यावर होते या दरम्यान त्यांनी शासकीय विश्रामगृहांमध्ये पत्रकारांशी संवाद साधला.

ते पुढे म्हणाले शिवसेना-भाजप युतीच्या काळामध्ये २०१२ मध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने शिवसेनेला पाठिंबा दिला म्हणूनच मुंबई महापालिकेत शिवसेनेची सत्ता येऊ शकली तो युतीचा धर्म रिपाईने मनापासून पाळला, कारण पक्षाचा मतदार प्रामाणिक आहे सध्या महायुतीच्या घटक पक्षांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी आपल्या सदस्यांची वर्णी लावण्याचे काम सुरू आहे महायुतीमध्ये राष्ट्रवादी सारखे मोठे मित्र आल्यामुळे रिपाईचे नाव विसरले जात आहे रिपाईच्या योगदानाचा महायुतीच्या घटक पक्षांनी योग्य तो सन्मान करावा कारण राज्याच्या कानाकोपऱ्यामध्ये पक्ष पोहोचलेला आहे. संपूर्ण भारतातून २०२८ मध्ये २८ आमदार निवडून आणू इतकी आमची ताकद आहे. मिझोराम आसाम मेघालय येथील सात राज्यांसह अंदमान निकोबारमध्ये पक्षाच्या शाखा सुरू करण्यात आल्या आहेत. नुकत्याच झालेल्या लक्षद्वीप दौऱ्यामध्ये सुमारे १० हजार कार्यकर्त्यांचा मेळावा घेण्यात आला येथील मतदान ६५ हजार इतके आहे तेथेही रिपाईला चांगला प्रतिसाद मिळत आहे असे असताना राज्यात मात्र घटक पक्ष रिपाई च्या युतीचा सन्मान करत नाही अशी खंत आठवले यांनी व्यक्त केली शिर्डीसह अन्य एक जागा आगामी लोकसभा निवडणुकांसाठी रिपाई करता सोडण्यात यावी अशी मागणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजप प्रदेशाध्यक्ष जे. पी. नड्डा, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली असल्याचे आठवले म्हणाले संपूर्ण देशाची गतिमान वाटचाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अंतर्गत सुरू आहे मुंबईमध्ये हिंदू मिलचे काम जोरात सुरू असून येथील तीनशे कोटीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला पंतप्रधान मोदी यांनी नुकतीच मान्यता दिली भारतीय संविधान म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान कमी करण्याचा प्रयत्न काँग्रेस कडून सुरू आहे मात्र मी जोपर्यंत सत्तेत आहे ते कोणाच्या बापालाही शक्य नाही .काँग्रेसचे प्रवक्ते सॅम पित्रोडा हे वारंवार डॉक्टर आंबेडकर यांचे राज्यघटनेतील योगदान नाकारण्याचे पाप करत आहेत व काँग्रेसही वेगवेगळ्या आंदोलनाच्या माध्यमातून देशांमध्ये दुहीचे वातावरण निर्माण करत आहे असा आरोप त्यांनी केला. पक्षाचे सचिव राहुल गांधी यांनी देश जोडो अभियान करण्यापेक्षा पक्ष जोडो अभियान करायला हवे त्यांचे सहकारी त्यांची साथ सोडून जात आहे यंदाच्या निवडणुकीमध्ये भाजपला ३७० पेक्षा जास्त जागा मिळणे अवघड नाही याविषयी मी विश्वास पूर्ण बोलत आहे पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळात एससी व एसटी प्रवर्गासाठी १ लाख १७ हजार कोटीच्या कल्याणकारी योजना राबवण्यात आल्या आहेत त्यामुळे संपूर्ण देशातील जनता पंतप्रधान मोदी यांच्याच मागे उभी आहे व राज्यातही महायुती ४५ पेक्षा जास्त जागा जिंकून येणार असा ठाम विश्वास आठवले यांनी व्यक्त केला.

कास पठार मार्गावरील ८३ अतिक्रमणांना महसूल विभागाच्या नोटीसा

फार्म हाऊस धारक व हॉटेल व्यवसायिकांची धाबे दणाणले

सातारा : यवतेश्वर कास रस्त्यावरील बांधकामांचे अतिक्रमण केलेल्या भूखंड धारकांना तसेच हॉटेल व्यवसायिकांना महसूल विभागाने नोटीस बजावल्या आहेत तहसीलदार नागेश गायकवाड यांनीही कारवाई केली असून संबंधितांना ३० दिवसाच्या आत अतिक्रमित बांधकाम काढून घेण्याचा इशारा देण्यात आला आहे या कारवाईमुळे सातारा तालुक्यामध्ये एकच खळबळ उडाली आहे

सातारा आणि जावळी तालुक्याच्या हद्दीवरील कास पठार परिसर हा नैसर्गिक दृष्ट्या संवेदनशील मानला जातो. कास पठार येथे पावसाळ्यानंतर फुलणारा फुलांचा हंगाम लक्षात घेऊन येथे पर्यटकांची मोठी गर्दी असते.

याचा फायदा घेऊन बाहेरील बडया हस्तींनी कवडी मोलाने जमिनी विकत घेऊन येथे मोठी बांधकामे केली आहेत. ही बांधकामे करताना महसूल विभागाच्या आणि वनविभागाच्या पर्यावरण नियमाचे सर्रास उल्लंघन झालेले आहे. दरवर्षी येथील बांधकामांचा प्रश्न ऐरणीवर येतो. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सुद्धा या संदर्भामध्ये कठोर पावले उचलायला सुरुवात केली आहेत.

त्यातच दोन दिवसांपूर्वी महसूल विभागाने यवतेश्वर कास रस्त्यावरील सुमारे ८३ भूखंड धारकांना बांधकामाचे अतिक्रमण केल्याच्या निमित्ताने महसूल अधिनियम ५३ नुसार नोटीस बजावलेली आहे.

या नोटीसमध्ये म्हणण्यात आलेले आहे की ही नोटीस प्राप्त झाल्यापासून संबंधित सर्वे गट नंबर मध्ये विनापरवाना केलेले बांधकाम ३० दिवसाच्या आत काढून घेण्यात यावे चालू असलेले बांधकाम त्वरित पूर्णपणे बंद करण्यात यावे सदरच्या सर्व बाबीची अथवा इतर कोणत्याही नुकसानी आपत्कालीन परिस्थिती उदभवल्यास स्वतः भूखंड धारक जबाबदार राहणार आहेत अशा नोटिसा महसूल यंत्रणेने संबंधित मिळकत धारकांना रवाना केल्यामुळे हॉटेल चालकांमध्ये एकच अस्वस्थता निर्माण झाली आहे.

लोकसभा निवडणुकांची आचारसंहिता तोंडावर असताना महसूल विभागाने कास परिसरातल्या अतिक्रमणांवर कारवाईचा बडगा उभारल्याने यासंदर्भात हॉटेल चालक यांची अडचण झालेली आहे येथील हॉटेल व्यवसायिकांना राजकीय वरदहस्त असल्याची नेहमीच चर्चा असते येथील अतिक्रमणांना अभय मिळणार नसल्याचे महसूल विभागाच्या या कारवाईने स्पष्ट झाले आहे

या कारवाईबाबत प्रचंड गोपनीयता बाळगण्यात आली आहे या कारवाईला साताऱ्याचे तहसीलदार नागेश गायकवाड यांनी दुजोरा दिला आहे.